# ज्ञानयुगातील नेतृत्व

विवेक सावंत

समाजाच्या सहित (म्हणजे समाजाच्या संगतीने) जाते ते साहित्य आणि समाजाला पुढे नेते ते नेतृत्व. द्रष्टे नेतृत्व असे मानते की, समाजाची ओळख ही केवळ त्याच्या भूतकाळात किंवा वर्तमानात शोधण्याची गोष्ट नसून विशिष्ट उद्दिष्टांसाठी भविष्यकाळात विचारपूर्वक घडवण्याची गोष्ट आहे. प्रदीर्घ काळ चाललेल्या आपल्या स्वातंत्र्य चळवळीतून जी मूल्ये आणि जे आदर्श आपल्यासमोर आले त्यातून भारताची भविष्यातील ओळख काय असावी याचे चित्र हळूहळू स्पष्ट होत गेले आणि अखेर सर्वमान्य स्वरूपात आपल्या राज्यघटनेमध्ये ते सुस्पष्ट शब्दात व्यक्त झाले.

आपली भविष्यातील ओळख काय असावी याचे असे सुस्पष्ट चित्र घटनात्मक स्वरूपात आपल्या भावी पिढ्यांपुढे ठेवणाऱ्या मोजक्या देशांमध्ये आपला देश आहे हे आपले भाग्य आहे. ते चित्र प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वस्व पणाला लावणे, त्या ध्येयपूर्तीसाठी समाजाला दिशा देणे, समाजाची जडणघडण करणे, त्या चित्रातील तत्त्वांच्या विरोधी तत्त्वांशी प्रसंगी रचनात्मक सांस्कृतिक संघर्ष करणे आणि ते चित्र प्रत्यक्षात आणल्यानंतर ते प्राणपणाने अबाधित राखणे, संवर्धित करणे हे आपल्या भावी नेतृत्वाचे इतिहासदत्त कर्तव्य आहे आणि तेच त्याच्यापुढील आव्हानही आहे.

आपल्या देशाचा विकास म्हणजे वरील घटनात्मक स्वप्नाची परिपूर्ती. या स्वप्नपूर्तीला खीळ घालणाऱ्या विषमता, गरीबी, उपासमार, बेकारी, भ्रष्टाचार, अस्वच्छता, अनारोग्य, कुपोषण, अज्ञान, निरक्षरता, निकृष्ट दर्जाचे शिक्षण, पराधीनता, अवैज्ञानिकता, दैववाद, सामाजिक अन्याय, हिंसाचार, अत्याचार, भाव, असहिष्णुता, असुरक्षितता, अशांतता, दहशतवाद, सांप्रदायिकता, मॉस्कतिक मागासलेपण, बेशिस्त, सुजाण नागरिकत्वाचा अभाव, पर्यावरणीय अरिष्ट अशा काही जटिल समस्या आपल्या देशात दीर्घकाळ टिकन राहिल्या आहेत. या समस्या पारंपरिक उपायांनी सुटण्यासारख्या असत्या तर अद्याप शिल्लक राहिल्या नसत्या.

पण यापैकी बहुतेक समस्या तर दिवसेंदिवस अधिक उग्र रूप धारण करत आहेत. म्हणूनच त्यांच्या निर्मूलनासाठी आपल्याला अपारंपरिक आणि कल्पक अशा नवोन्मेषी उपायांची (nonconventional, imaginative and Finnovative solutions) गरज आहे. असे उपाय इतरत्र कमालीचे यशस्वी होत आहेत. देश असे अपारंपरिक उपाय शोधू शकणाऱ्या कल्पक व सर्जनशील नेतृत्वाच्या प्रतीक्षेत आहे. सातत्याने नवोन्मेष (innovations) करून जटील समस्यांचे समूळ उच्चाटन करणारी नेतृत्वाची नवी पिढी निर्माण करण्यासाठी एक पर्यायी नेतृत्व विकासनीती आवश्यक आहे.

गेल्या दहा हजार वर्षात मानवी समाज शेतीप्रधान, उद्योगप्रधान आणि माहितीप्रधान अवस्थांमधून संक्रमित होत होत आता ज्ञानप्रधान अवस्थेत प्रवेश करत आहे. पूर्वीच्या तीनही

अवस्थांपेक्षा ही अवस्था मुळातच खूप वेगळी आहे. पूर्वीच्या अवस्थांमध्ये मानवी समाज ज्ञान वापरत नव्हता असे नाही. पण त्याच्या जीवनात ज्ञानाला मध्यवर्ती स्थान नव्हते. मध्यवर्ती स्थान निसर्ग संपत्ती, खनिजे, कच्चा माल, ऊर्जा, जमीन, प्राण्यांचे आणि माणसांचे शारीरिक श्रम, आर्थिक भांडवल, माहिती व तिच्यावर वेगाने व स्वस्तात प्रक्रिया करण्याची क्षमता इत्यादींना होते. या स्रोतांची मालकी किंवा उपलब्धता असल्याशिवाय स्वत:ला किवा समाजाचा विकास घडवून आणणे शक्य नव्हते. या अवस्थांमध्ये कुठल्याही वस्तू किंवा सेवेचे मूल्य हे त्यातील ज्ञानाच्या अंशापेक्षा त्यातील जड पदार्थांचे स्वरूप व प्रमाण, उर्जा, श्रम, आर्थिक भांडवल किंवा माहिती यांच्या अंशावरून ठरत असे. त्यामुळे इतिहासक्रमात राष्ट्रीय उत्पन्नामध्ये प्रथम शेती उत्पादनाचा, । औद्योगिक उत्पादनाचा आणि त्यानंतर कालांतराने माहितीवर आधारित सेवा क्षेत्राचा वाटा वाढत गेल्याचे आपल्याला दिसते.

एकविसाव्या शतकापासून मात्र नव्या कर्मशील ज्ञानाला अनन्यसाधारण , प्राप्त होताना आपण बघतो आहोत. या शतकात निसर्ग संपत्ती, खनिजे माल ऊर्जा, जमीन, शारीरिक श्रम करणारी मोठी प्रशिक्षित लोकसंख्या, आणि भांडवल, इत्यादि पुरेसे नसूनही केवळ ज्ञानाच्या, बौद्धिक संपदेच्या बळावर काही समाज, काही देश, काही उद्योग आपला विलक्षण विकास करताना दिस लागले आहेत. हे पूर्वीच्या शतकांमध्ये कधीही झाले नव्हते. कर्मशील ज्ञान आणि संपत्ती हे शब्द या शतकात समानार्थी होत आहेत.

ज्ञानाधिष्ठित उद्योग, ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था व ज्ञानाधिष्ठित समाज हे या शतकाचे परवलीचे शब्द होत आहेत. आपले अस्तित्व टिकवण्यासाठी व्यक्तींना. समूहांना, राष्ट्रांना नवनवीन ज्ञान आत्मसात करण्याची पूर्वी कधीही नव्हती एवढी नितांत आवश्यकता या शतकात भासत आहे. व्यक्तिंच्या, समूहांच्या, राष्ट्रांच्या आणि एकंदर मानवी समाजाच्या अस्तित्वासाठी ज्ञान, विकासासाठी ज्ञान आणि आत्मसन्मानासाठी ज्ञान अशी ज्ञानाची त्रिसूत्री या शतकात सिद्ध होणार आहे.

गेल्या दोन शतकांत श्रीमंत देश अधिकाधिक श्रीमंत होत गेले ते त्यांनी केलेल्या नवीन ज्ञानाच्या प्रचंड निर्मितीमुळे. केवळ विज्ञान-तंत्रज्ञानच नव्हे, तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या ज्ञानशाखांमध्ये अत्याधुनिक ज्ञानाच्या निर्मितीचा त्यांनी ध्यास घेतला. हे नवीन ज्ञान समाजातल्या भेदाभेदांना पार करत सर्व स्तरांपर्यंत सतत वेगाने वितरित करण्याचा महाप्रयास त्यांनी केला. हे नवीन ज्ञान जुन्या उपयुक्त ज्ञानाशी जोडत, जुन्या-नव्याचे एकात्मिक व्यवस्थापन त्यांनी केले. सर्वसामान्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देत या नवीन ज्ञानाचा आर्थिक व सामाजिक विकासासाठी सतत परिणामकारकपणे वापर केला. नवीन ज्ञानाची इंटरनेटद्वारे जोडलेल्या लोकसमूहांच्या सहभागातून सहनिर्मिती, वितरण, व्यवस्थापन आणि सर्वसमावेशक विकासासाठी उपयोजन अशा विशिष्ट विकासनीतीतून वर उल्लेखिलेल्या त्रिसूत्रीने आकार घेतला. आता या ज्ञानाधिष्ठित प्रक्रियेला

विकासाच्या क्षेत्रात मध्यवर्ती स्वरूप प्राप्त झाले आहे व ज्ञानप्रधान सभ्यता किंवा ज्ञानाधिष्ठित समाज आकारात आहेत.

ज्ञानाधिष्ठित अशा या विलक्षण संरचनेमध्ये कच्चा मालही ज्ञान व पक्का मालही ज्ञानच. नवी उत्पादने व नव्या सेवांचा मख्य आशय ज्ञानच. त्यातील भौतिक आशय कमी होत जाऊन त्याची जागा ज्ञान घेत आहे आणि तीही मालीच्या वेगाने. त्यामुळे या ज्ञानकेंद्री प्रक्रियेमुळे उत्तरोत्तर नैसर्गिक संसाधनांची अळपट्री आणि पर्यावरणाचा विनाश टाळून अधिकाधिक लोकसंख्येला चांगले समान मिळण्याच्या शक्यता वाढत आहेत. विकास क्षेत्रात 'पर्याय' या शब्दाचा 'पर्यावरणाच्या दृष्टीने यथार्थ' असा नवा अर्थ लावणे शक्य होत आहे.

स्मार्ट फोनची जी किंमत आपण मोजतो ती त्याच्यातील जडपदार्थांच्या वजनासाठी नसून त्यामागील निसर्ग विज्ञान, मनोविज्ञान, समाजविज्ञान, तंत्रज्ञान आणि कलात्मक आविष्कार यांच्या बौद्धिक संपदेसाठी म्हणजेच मुख्यत्वे नवकल्पनांच्या आणि ज्ञानाच्या आशयासाठी आहे. जशी कच्च्या मालाची आणि ऊर्जेची जागा ज्ञान घेत आहे तशीच शारीरिक श्रमाची जागाही बौद्धिक श्रम घेत आहेत. आर्थिक भांडवलाची जागा कर्मशील स्वरूपातील ज्ञान-भांडवल घेत आहे आणि भौतिक किंवा आर्थिक मालमत्तेपेक्षा बौद्धिक संपदेला महत्त्व प्राप्त होत आहे. कंपन्यांचे बाजारमूल्य निश्चित करताना आता त्यांच्याकडील जमीनजुमला, प्लांट व मशिनरी किंवा आर्थिक मालमत्तेपेक्षा त्यांच्याकडील तज्ञ मनुष्यबळ आणि त्यांची पेटंट्स आणि कॉपीराईटस् इ. च्या स्वरूपातील नोंदणीकृत बौद्धिक संपदा आणि त्यांचे बौद्धिक स्वामित्व हक्क विचारात घेतले जातात.

अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पन्नातील बौद्धिक स्वामित्व हक्कांच्या मानधनापोटी जगभरातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा ३५ टक्क्यांवर गेला असून त्याद्वारे ४ कोटी रोजगार उपलब्ध झाले आहेत. अमेरिकेतील एकंदर रोजगारांच्या ते २८% आहेत. अमेरिकेची संपूर्ण अर्थव्यवस्था झपाट्याने ज्ञानप्रधान होत आहे. जुन्या जडपदार्थकन्द्री किंवा ऊजकिंद्री किंवा श्रमकेन्द्री प्रक्रिया वेगाने कालबाह्य होत आहेत आणि नव्या ज्ञानकेन्द्री प्रक्रिया त्यांची जागा घेत आहेत. इ.स. २०१२ पासून अमेरिकेतील कुठलाही उद्योग एक तर नोंदणीकृत बौद्धिक संपदा निर्माण तरी करत आहे आणि/किंवा ती वापरत तरी आहे. बौद्धिक संपदा हा त्या अर्थव्यवस्थेचा श्वास हाऊ पाहत आहे. ज्ञानप्रधान अवस्थेचा हा विकास यापुढली काही दशके केवळ अमेरिकेतच नव्हे तर भारतात आणि जगभर वेगाने होत राहणार हे निश्चित. त्यामुळे शेती, उद्योग आणि सेवा इत्यादि सर्वच क्षेत्रे वाढत राहतील पण ती वेगाने ज्ञानप्रधान होऊ लागतील.

ज्ञानाचा चहुबाजूंनी आणि सेकंदासेकंदाला विस्फोट होत आहे. ज्ञान ते एक व्यवच्छेदक लक्षण आहे. अभिजनांची मक्तेदारी संपवत समाजाच्या स्तरातील लोक आता ज्ञानाची निर्मिती करत आहेत.

एकविसावे शतक : होताना जन्मलेले विकिपेडिया आणि तत्सम मुक्त ज्ञानस्रोत हे सर्वसामान्य लोकांना ज्ञान क्षेत्रातील असामान्य अशा सामुहिक कृतीचे पहिलेवहिले नमुने आहेत इंटरनेटमुळे ज्ञानाची सर्वदूर उपलब्धता आणि ज्ञानाची सहनिर्मिती भौगोलिक बंधने दूर सारून विलक्षण वेगाने वाढत आहे. मानवी समाज जणू काही एका चिरायू अशा वैश्विक मेंदूची निर्मिती करत आहे आणि त्या समाजातला प्रत्येकजण त्या मेंदूचा बव्हंशी मुक्त वापर करणार आहे.

या पार्श्वभूमीवर आता आपल्या देशाला गरज आहे कोट्यवधी गरीब जनतेच्या जीवनातील वर उल्लेखिलेल्या जटील समस्या सोडवू शकणाऱ्या सर्जनशील, नवोन्मेषी ज्ञानकर्मींची. अशा असंख्य लोकाभिमुख ज्ञानकर्मींची फौज कशी कार्यरत करायची व ठेवायची हे २०३० मधील नेतृत्वासमोरील प्रमुख आव्हान असणार आहे.

आपल्या अक्राळविक्राळ स्वरूप धारण करणाऱ्या वरील समस्यांची अशी अपारंपरिक सोडवणूक न केल्यास प्रगत देशांचा आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा नवा ज्ञानाधिष्ठित साम्राज्यवाद आपले शोषण करेल आणि आपल्या स्वातंत्र्याला ग्रहण लागेल. राज्य घटनेत अभिप्रेत असलेला आदर्श समाज आपण प्रत्यक्षात आणू शकणार नाही. आपल्या मागासलेपणाचा गैरफायदा उठवून उद्योगप्रधान देशांनी केलेल्या आपल्या शोषणाचा इतिहास फार जुना नाही. आजही त्यांच्याकडून ते मोठ्या प्रमाणावर चालू आहे. आपल्या देशातील ८० कोटी लोकांच्या भीषण दारिद्र्याचे ते मुख्य कारण आहे. आता तसेच शोषण नव्या ज्ञानाची मक्तेदारी मिळवणाऱ्या देशांकडून होईल. आत्महत्येचा दुर्दैवी मार्ग निवडणाऱ्या आपल्या शेतकऱ्याला केवळ आर्थिक पॅकेज देऊन त्याची आत्महत्या टळणार नाही. त्याला संजीवक आणि स्वावलंबी शेतीसाठी, त्याचे केवळ उत्पादनच नव्हे तर उत्पन्नही वाढवणाऱ्या नव्या कर्मशील आणि किफायतशीर ज्ञानाच्या आणि बंधुभावी संवादाच्या सातत्यपूर्ण पॅकेजची गरज आहे. दारिद्र्यमुक्त, विषमतामुक्त, सर्जनशील, नवोन्मेषी, स्वतंत्र वृत्तीच्या, आधुनिक नैतिक जीवन मूल्ये जपणाऱ्या, पर्यावरणसंवर्धक आणि लोकशाही समाजाच्या निर्मितीची जबाबदारी असे ज्ञानाधिष्टीत समाजविकासकेंद्री नेतृत्वच पेलू शकेल.

आपल्या देशापुढील दशकानुदशके रेंगाळलेल्या वरील जटील समस्यांची सोडवणूक जसकीय किंवा खासगी किंवा सामाजिक क्षेत्रातील एकेकट्या संस्थांना स्वबळावर जमलेली नाही हा इतिहास बोलका आहे. त्यासाठी वर विषद केलेला ज्ञानप्रधान मार्ग चोखाळताना एका रणनीतीची जोड आवश्यक आहे. ती म्हणजे शासकीय क्षेत्र, खासगी क्षेत्र आणि सामाजिक क्षेत्र यांची भागीदारी टिकाऊ व यशस्वी करून दाखवणे. २०३० मधील नेतृत्वासमोरील हे एक महत्त्वाचे आव्हान असेल. हे करून दाखवण्यासाठी उदारमतवादी व सर्वांना बरोबर घेऊन जाणाऱ्या आश्वासक नेतृत्वाची गरज आहे.

शासकीय यंत्रणेत प्रभावी नेतृत्व, लोकाभिमुखता व विश्वसनीयता असेल तर चमत्कार वाटावा इतक्या प्रभावीपणे काम होऊ शकते. जटील समस्यांच्या निवारणात शासनाचा पाठिंबा आणि सहभाग

हवाच. शासकीय क्षेत्राकडून दूरगामी नियोजन क्षमता, कायदेशीरपणा, पारदर्शकता, अर्थसंकल्पीय तरतूद व राजकीय इच्छाशक्ती या आणि अशा बाबी श्रेयस्कर आणि अपेक्षित आहेत. पण शासकीय दप्तर दिरंगाई, पुढाकार घेऊन काम करणाऱ्यांपेक्षा सांगकामे व कामसांगे यांची गर्दी, विलंब, एकाधिकार, कार्यपूर्तीपेक्षा कार्यपद्धतीला, कार्यप्रणालीला अवास्तव महत्त्व, काटकसरीचा अभाव, संसाधने व पैशाची उधळपट्टी, सर्वंकष नियंत्रण व त्यातून बोकाळणारा भ्रष्टाचार व अन्याय्य दमन मात्र नको.

खासगी क्षेत्रात (विशेषत: लघु आणि मध्यम उद्योजकांमध्ये) उद्यमशीलता आणि प्रयोगशीलता असते. महत्त्वाकांक्षेपोटी पुढाकार घेण्याकडे कल असतो. ग्राहकांशी संवाद साधण्याचे कौशल्य असते. संधींचे सोने करण्याची चपळता असते. कमी वेळेत 1 उद्दिष्टपूर्तीसाठी लागणारी एकाग्रता, व्यावसायिकता आणि कार्यक्षमता असते. ॥ लक्ष्यपूर्तीचा व अपेक्षित फलनिष्पत्तीचा ध्यास असतो. जोखीम स्वीकारण्याची, धाडस ना करण्याची जिद्द असते आणि बाजारपेठेतील स्पर्धेला आणि माफक नफ्यासह आर्थिक ही आत्मनिर्भर्तेला पर्याय नसतो याची पक्की जाण असते. सबबी न सांगता आणि येणाऱ्या या अडचणींवर कल्पकतेने मात करून ग्राहकाला वेळच्यावेळी उत्पादन किंवा सेवा देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तयारी असते. गुणवत्तेच्या बाबतीत ग्राहकाभिमुख राहण्याची जबाबदारी असते; या श्रेयस्कर गुणांची देशाला गरज दी आहे. पण अधिकाधिक नफ्याचा हव्यास, सामाजिक व पर्यावरणीय उत्तरदायित्वाचा अभाव, आणि साधनशुचितेचा अभाव मात्र नको.

सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्यांना उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित, विस्थापित पीडित, शोषित, गरीब आणि दुर्बल अशा तळातल्या समाज घटकांच्या वास्तविकतेचे सतत भान असते. त्यांच्या हितासाठी समाजपरिवर्तनाचा आणि सर्वसमावेशक अशा आर्थिक-सामाजिक विकासाचा ध्यास असतो, धोरणात्मक दिशा असते, प्रचलित व्यवस्थेची सखोल व निष्ठूर समीक्षा असते, संघटन असते, लोकसहभागावर विश्वास असतो व समस्यापूर्तीसाठी अभ्यास, संशोधन व ज्ञान निर्मिती केलेली असते, त्यावर आधारित पथदर्शक असे विधायक कार्यही अनेकवेळा असते. विषमतेविरुध्द आणि अन्यायाविरुध्द मनस्वी चीड असते. मूल्यनिष्ठा, त्याग, सेवावृत्ती, समर्पितवृत्ती व प्रसंगी संघर्ष करण्याची तयारी असते. सामाजिक क्षेत्राच्या या बाबी श्रेयस्कर आहेत. पण जटील समस्यांच्या सोडवणुकीसाठी खासगी क्षेत्राच्या सहभागाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून बघण्याची आवश्यकता आहे. तसेच केवल दानाच्या व दयेच्या प्रेरणेने कोट्यवधी गरिबांना न्याय मिळेल हे भाबडेपणही बाजूला ठेवावे लागेल.

या तीनही क्षेत्रांतल्या त्याज्य संभाव्यता निग्रहाने बाजूला ठेवून त्यांच्या श्रेयस्कर वैशिष्ट्यांचा मिलाफ घडवून आणणे अपरिहार्य आहे. ही तीनही क्षेत्रे परस्पर सहकार्याने समान सामाजिक उद्दिष्टांसाठी व वर उल्लेखिलेल्या स्वप्नपूर्तीसाठी कार्यरत ठेवणारी टीकाऊ संस्थात्मक संरचना निर्माण करणे हे ज्ञानयुगातील नेतृत्वासमोरील मोठे आव्हान आहे.

भारत या शब्दाची संस्कृतातील व्युत्पत्ती भा नाम अभा, अभा नाम प्रभा, प्रभा नाम ज्ञानम्, तत्र रतः अशी आहे. त्याचा अर्थ ज्ञानाच्या उपासनेत रममाण झालेला देश, समाज म्हणजे भारत. आपल्या देशाचे भारत हे नाव या अर्थाने सार्थ करून दाखवणे हेही ज्ञानयुगातील नेतृत्वासमोरील असेच एक मोठे आव्हान आहे.